# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परिपत्रक

परिपत्रक क्र. आस्था/आरओ/२३/२०२६

**संदर्भ:- ममआ-२०२६/यशोदा एआय/का-३/७४७ दि. १२/०८/२०२६.**

**विषय:- राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी यशोदा (AI)-कृत्रिम बुध्दिमता आणि महिला या विषयावर आयोजित क्षमता बांधणी कार्यक्रमाबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयी विद्यापीठ मुख्य परिसरातील सर्व विद्यार्थीनी, महिला शिक्षक, महिला अधिकारी व महिला कर्मचारी यांना कळविण्यात येते की, राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने **'यशोदा (AI)-कृत्रिम बुध्दिमता आणि महिला'** या विषयावर तापडीया नाट्य मंदिर, छत्रपती संभाजीनगर येथे दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ ते ६ या वेळेत एक दिवसीय क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमामध्ये **मा. श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्ष, राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली** या स्वतः उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत.

यशोदा एआय या उपक्रमाचा मुख्य उद्देश महिलांमध्ये कृत्रिम बुध्दिमत्ता (Artificial Intelligence - AI) व्दारे निमार्ण होणाऱ्या संधींबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्याचबरोबर वाढत्या डिजिटल धोक्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी त्यांना ज्ञान आणि साधनांनी सक्षम करणे हा आहे. सहभागींना कृत्रिम बुध्दिमत्तेच्या (AI) मूलभूत गोष्टी, दैनंदिन जीवन/ रोजगार आणि उद्योजकतेमध्ये एआयच्या व्यावहारिक वापर आणि डिजिटल सुरक्षितता, सायबर धोके आणि एआयच्या नैतिक वापराविषयी (ethical use) जागरूकता निर्माण करणे ही कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. दैनंदिन जीवनातील एआय समजून घेणे (Understanding AI in Daily Life) व एआय मधील संधी आणि उपयोग (Opportunities & Use of AI) याबाबत तज्ञांमार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

तरी सदर कार्यक्रसाठी विद्यापीठातीलरा सर्व विद्यार्थीनी, महिला शिक्षका, महिला अधिकारी व महिला कर्मचारी यांनी दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ ते ६ या कालावधी सदरील कार्यक्रमास उपस्थित रहावे. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४ )(
संदर्भ :- आस्था/आरओ/२०२६/२३ )(
दिनांक :- १४-०८-२०२६ )(

**कुलसचिव**

या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव:-
संबधीत सर्व शैक्षणिक/ प्रशासकीय विभागप्रमुख.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission for Women**

गृहनिर्माण भवन ( म्हाडा बिल्डिंग )
पोटमाळा, कलानगर, वांद्रे ( पूर्व ), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 2707
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Toll Free No. 155209
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

जावक क्रमांक : ममआ-२०२६/यशोदा एआय/का-३/७४१
दिनांक : १२/०८/२०२६

प्रति,
मा.कुलसचिव
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
जिल्हा - छत्रपती संभाजीनगर

विषय : राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे दि.२२ ऑगस्ट २०२६ **रोजी यशोदा (AI)-कृत्रिम बुध्दिमता आणि महिला** या विषयावर आयोजित क्षमता बांधणी कार्यक्रमाबाबत.

मा.महोदय,

राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने **'यशोदा (AI)-कृत्रिम बुध्दिमता आणि महिला'** या विषयावर, तापडीया नाटय मंदिर, छत्रपती संभाजीनगर येथे दि.२२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ ते ६ या वेळेत एक दिवसीय क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमामध्ये **मा. श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्ष, राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली** या स्वत: उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

यशोदा एआय या उपक्रमाचा मुख्य उद्देश महिलांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) द्वारे निर्माण होणाऱ्या संधींबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्याचबरोबर वाढत्या डिजिटल धोक्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी त्यांना ज्ञान आणि साधनांनी सक्षम करणे हा आहे .सहभागींना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) मूलभूत गोष्टी ,दैनंदिन जीवन/ रोजगार आणि उद्योजकतेमध्ये एआयच्या व्यावहारिक वापर आणि डिजिटल सुरक्षितता, सायबर धोके आणि एआयच्या नैतिक वापराविषयी (ethical use) जागरूकता निर्माण करणे ही कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे आहेत .दैनंदिन जीवनातील एआय समजून घेणे (Understanding AI in Daily Life) व एआय मधील संधी आणि उपयोग (Opportunities & Use of AI) याबाबत तज्ञांमार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे .

तरी सदर कार्यक्रमासाठी आपण विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहावे. तसेच आपल्या विद्यापीठातील विद्यार्थीनी, महिला शिक्षिका, प्राध्यापिका यांना उपस्थित राहण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावर सूचित करण्यात यावे, ही विनंती.

आपली,

नंदिनी आवडे (भा.प्र.से)
सदस्य सचिव